५२३/५

**सर्व कोषागारात मुद्रांक विक्रेत्याकडुन (stamp vendor) "ग्रास"प्रणाली मार्फत ई-पेमेंट स्विकारणेबाबत.**

**संचालनालय,**
**लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**नवीन शासकीय कुटीर क्रमांक १५ व १६**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१.**

सं.क्र.संलेवको /व्ह.ट्रे-२०११/मुविआ/न.क्र.११९/२७१, दिनांक ०५/१०/२०११.

## कार्यालयीन आदेश :-

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन शासनाकडे जमा होणारा महसूल व महसूलेतर जमा रकमा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने शासनाच्या तिजोरीत जमा व्हाव्यात, याकरिता "शासकीय जमा लेखांकन पध्दती" (Government Receipt Accounting System-GRAS ) या प्रणालीची निर्मिती करण्यात आलेली आहे. याकरिता बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स सुविधांचा वापर करुन जनतेला विनासायास महाराष्ट्र शासनाचा कर व अन्य भरणा करता यावा या उद्देशाने इंटरनेट बँकिंग सुविधेचा वापर व बँकांच्या ई-पेमेंट गेटवे पध्दतीचा उपयोग या प्रणालीत करण्यात आला आहे.

आपल्या संचालनालया मार्फत सर्व विभागीय उप संचालक तसेच सर्व कोषागार अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, कोषागारातर्फे मुद्रांक विक्रीबाबत मुद्रांक विक्रेत्याकडून (stamp vendor) रोख रक्कम / धनाकर्ष न स्विकारता यापुढे **"ग्रास"** प्रणाली मार्फतच ई-पेमेंट द्वारे स्विकारण्यात यावा. याबाबत आपल्या स्तरावर संबंधीतांना योग्यत्या सूचना व प्रशिक्षण देण्यात यावे. त्यानुसार ही कार्यपध्दती सुरू करावी.

**"ग्रास"**प्रणाली वापराकरीता कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी, मुंबई यांचेकडून "ग्रास" प्रणालीतील लॉगईन आयडी व पासवर्ड उपलब्ध करून घ्यावा.

सर्व कोषागारातर्फे स्टॅपपेपर विक्रीबाबत मुद्रांक विक्रेत्याकडून (stamp vendor) रोख रक्कम / धनाकर्ष न स्विकारता **"ग्रास"** प्रणाली मार्फतच ई-पेमेंट गेटवेने स्विकारण्यासाठीची प्रक्रिया आता टप्प्या टप्प्याने सुरू करावी मात्र दिनांक ०१ जानेवारी, २०१२ पासून मुद्रांक विक्रेत्याकडून (stamp vendor) रोख रक्कम / धनाकर्ष स्विकारणे पूर्णत बंद करून सर्व स्विकृती ग्रासप्रणाली द्वारे करण्याचे नियोजन आहे, त्याचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

संचालक
लेखा व कोषागारे , मुंबई.

प्रत : -

१. सहसंचालक, ले.व, को. ,कोकण /नाशिक /पुणे / अमरावती /नागपूर /औरंगाबाद
२. सर्व कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकारी
३. लेखा अधिकारी, कोषागार संकीर्ण शाखा ,संचालनालय लेखा व कोषागारे,मुंबई.
४. कोषागार अधिकारी, व्हर्च्युअल ट्रेझरी ,मुंबई.
५. मा. सचिव (ले.व को.), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई यांना माहीतीस्तव.
६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र प्रशासकीय भवन, पुणे- ४११ ००१ यांस सस्नेह अग्रेषित.